# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटेट) २०१७

## प्रवेशपत्रासंबंधी प्रसिध्दी निवेदन

दिनांक २२ जुलै २०१७ रोजी होणाऱ्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटेट) ची प्रवेशपत्रे परीक्षार्थ्यांना लॉगिनव्दारे ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. तथापी काही अपरिहार्य व तांत्रिक कारणामुळे परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने यशश्वीरीत्या (Payment is Done Successfully) भरुनही प्रवेशपत्र प्राप्त न झालेल्या परीक्षार्थ्यांनी ऑनलाईन आवेदनपत्रात नमूद केलेल्या परीक्षा केंद्राचा जिल्हा असलेल्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / शिक्षण निरीक्षक, मुंबई यांचेकडे संपर्क साधावा. ऑनलाईन आवेदनपत्राची छापील प्रत (Print Copy) किंवा Transaction Acknowledgement ची प्रत त्यांचेकडे सादर करावी.

ऑनलाईन आवेदनपत्राच्या छापील प्रतीतील पृष्ठ क्रमांक २ वरील
मुद्दा क्रमांक १७ Transaction Reference No,
मुद्दा क्रमांक १७.१ Bank Referance No.
मुद्दा क्रमांक १७.२ Deposite Date

उपरोक्त मुद्दांच्या रकान्यात माहिती छापील स्वरूपात भरलेली असल्यास किंवा परीक्षार्थ्याकडे Transaction Acknowledgement वर Payment Status या मुद्दयासमोर Payment is done successfully अशी माहिती छापील स्वरूपात असल्यासच अतिरिक्त बैठक क्रमांकाने परीक्षेस प्रविष्ठ होता येईल. याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / शिक्षण निरीक्षक, मुंबई यांना सूचना देण्यात आलेल्या असून अशा परीक्षार्थ्यांनी त्यांचेशी संपर्क साधवा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर परीक्षार्थ्याने जावे. केंद्रसंचालकांकडे अशा परीक्षार्थ्याने त्याबाबतचे लेखी निवेदन विहीत नमुन्यात द्यावे. केंद्रसंचालक संबंधित उमेदवारास अतिरिक्त बैठक क्रमांक देतील. त्यानुसार परीक्षार्थ्याने परीक्षेस प्रविष्ठ व्हावे.

ऑनलाईन आवेदनपत्राच्या छापील प्रतीतील पृष्ठ क्रमांक २ वरील, मुद्दा क्रमांक १७, मुद्दा क्रमांक १७.१, मुद्दा क्रमांक १७.२ या रकान्यात NA असे नमूद केलेले असल्यास किंवा Transaction Acknowledgement वर Payment Status या मुद्दयासमोर Payment is not done successfully असे नमूद केलेले असल्यास अशा परीक्षार्थ्यास परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही याची नोंद घ्यावी.

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०१

पुणे, दिनांक :- २१/०७/२०१७